# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## निदेश क्रमांक १२ / २०१८

**विद्यापीठ शिक्षकेत्तर पदांच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव साक्षात्कारासाठी गुणवत्ता ठरविण्याकरिता परीक्षा पध्दती आणि निवड समितीची रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०१८**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे.(महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७) ;

**आणि**

**ज्याअर्थी**, वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोलीसाठी लागू करण्यात आला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** विद्यापीठ शिक्षकेत्तर पदाच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना इ. विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०१६(निदेश क्र. १९६/२०१६) हा दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा.कुलगुरूंनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम १४(८) अंतर्गत निर्गमित केला होता आणि तो दिनांक ११/११/२०१६ पासून लागू करण्यात आला होता ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ हा परिनियमामध्ये रूपांतरित करण्यात आला नव्हता ;

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ च्या कलम १२(८) च्या परंतुकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार निदेश क्र. १९८/२०१६ ची परिणामकारकता दिनांक १०/०५/२०१७ रोजी आपोआप व्यपगत झाली होती ;

**आणि**

**ज्याअर्थी,** सदर निदेशामध्ये नमुद असलेला विषय परिनियमाद्वारे नियमित होणे आवश्यक होते ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ चे रूपांतरण परिनियमामध्ये करण्यात येवू न शकल्यामुळे ;

आणि

**ज्याअर्थी**, निदेशाचे रूपांतरण परिनियमात केले जाण्याची प्रक्रिया वेळ खाऊ स्वरूपाची असल्यामुळे ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ ची परिणामकारकता दिनांक १०/०५/२०१७ रोजी समाप्त झाली होती ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ चे नुतनीकरण नवीन निदेशामध्ये केले जाणे आवश्यक होते ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ हा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२(८) च्या परंतुकामधील तरतुदी अंतर्गत व्यपगत झाला होता म्हणून कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) मधील तरतुदीअंतर्गत निदेश क्र. ८/२०१७ हा दि. १९/०५/२०१७ रोजी निर्गमित केला होता ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ८/२०१७ हा सहा महिन्याच्या कालावधीमध्ये परिनियमात रूपांतरित होवू शकला नव्हता ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ८/२०१७ हा दि. १८/११/२०१७ रोजी अधिनियमातील तरतुदीअंतर्गत व्यपगत झाला होता ;

आणि

**ज्याअर्थी**, विद्यापीठ आस्थापनेवरील मंजुर वर्ग १, वर्ग २, वर्ग ३ आणि वर्ग ४ मध्ये समाविष्ट पदांवर सरळ सेवा भर्ती प्रक्रियेसाठी परीक्षेचे आयोजन, व्याप्ती आणि वर्गवारीनुसार परीक्षेचे स्वरूप ठरवून परीक्षा आयोजित केल्या जाण्याच्या निर्णय व्यवस्थापन परिषदेने दिनांक ७/०५/२०१८ रोजी भरलेल्या सभेमध्ये बाब क्रमांक ४ अंतर्गत घेतला आहे ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ८/२०१७ च्या स्थानावर परिक्षा आयोजनासंबंधी तरतुद करून नवीन निदेश निर्गमित केल्या जाण्याची आवश्यकता आहे.

**त्याअर्थी,** मी. डॉ. ना. व्यं. कल्याणकर, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये निदेश क्र. ८/२०१७ चे नुतनीकरण केल्या जाण्यासाठी खाली नमुद असलेले निदेश निर्गमित करीत आहे.

१. या निदेशाला '' विद्यापीठ शिक्षकेत्तर पदांच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव साक्षात्कारासाठी गुणवत्ता ठरविण्याकरिता परीक्षा पध्दती आणि निवड समितीची रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०१८''.
२. हा निदेश दि. १०/०५/२०१७ पासून अंमलात येईल.
३. महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र शासनाने शिक्षकेत्तर पदांच्या सेवाशर्ती नुसार सरळसेवा भरती व पदोन्नती विषयी वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन राजपत्र, शासन परिपत्रक, आदेश, विनियम इत्यादीमधील तरतुदी आजही लागू असतील.
४. विद्यापीठ आस्थापनेवरील सर्व पदवर्गवारीतील सरळ सेवा भरतीसाठी स्वत:ला पात्र समजणाऱ्या उमेदवाराला आवेदन पत्राचे शुल्क म्हणून खाली नमुद असलेली राशी धनाकर्षाद्वारे आवेदन पत्रासोबत भरावी लागेल.
   अ) सर्वसाधारण वर्गवारीचा उमेदवार रूपये ५००/—
   ब) राखीव प्रवर्गातील उमेदवार रूपये ३००/—

   पदवर्गवारीनिहाय विद्यापीठाला जे अर्ज प्राप्त होतील त्या अर्जांमधून पात्रता धारक उमेदवार शोधून काढण्यासाठी सर्व अर्जांची छानणी करण्यात येवून पात्रताधारक उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल आणि पात्रताधारक उमेदवारांना सरळ सेवा भरती प्रक्रियेसाठी आयोजित परीक्षेमध्ये सामावून घेण्यात येईल.
५. अ) वर्ग १, वर्ग २ आणि वर्ग ४ पदांवरील सरळ सेवा भरती प्रक्रियेसाठी लेखी, परिक्षेचे आयोजन करण्यात येवून परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर पदनिहाय गुणवत्ता यादी तयार करून उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. वर्ग ३ मध्ये समाविष्ट पदांकरिता लेखी आणि संगणकीय परीक्षांचे आयोजन केले

जाईल. परिक्षांमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करून उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

ब) पदवर्गनिहाय आयोजित परीक्षेमध्ये उमेदवाराने प्राप्त केलेले एकूण गुण विचारात घेवून ही गुणवत्ता यादी तयार केली जाईल. या यादीमधील उमेदवारांना खाली नमुद असलेल्या सुत्रानुसार मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**सुत्रः—**

पदभरती संख्या — १ (गुणवत्ता यादीनुसार ८ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — २ (गुणवत्ता यादीनुसार १० उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ३ (गुणवत्ता यादीनुसार १२ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ४ (गुणवत्ता यादीनुसार १४ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ५ (गुणवत्ता यादीनुसार १६ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)

क) मुलाखतीसाठी बोलविलेल्या उमेदवांरामधून निवड समितीद्वारे उमेदवाराची निवड करण्यात येईल. ही निवड केली जाण्यासाठी निवड समितीमध्ये समाविष्ट असलेल्या सदस्यांची संख्या विचारात घेण्यात येईल. निवड समितीच्या प्रत्येक सदस्यास एकूण १० गुणांमधून गुणदान प्रदान करण्याचा अधिकार प्राप्त असेल. निवड समितीच्या प्रत्येक सदस्याने मुलाखतीमधील उमेदवाराच्या कामगिरीच्या आधारावर १० गुणांपैकी गुणदान केल्यानंतर निवड समितीच्या उपस्थित सदस्यांच्या गुणदानाची बेरीज करण्यात येईल आणि निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या गुणांच्या एकूण बेरीज संख्येला निवड समितीच्या सर्व उपस्थित सदस्याच्या एकूण संख्येने विभाजित केल्यानंतर येणारी संख्या म्हणजे सदर उमेदवाराने १० गुणांपैकी प्राप्त केलेल्या गुणांचा आकडा असेल.

उमेदवाराने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या संख्येत सदर उमेदवाराने मुलाखतीमधील कामगिरीच्या आधारावर प्राप्त केलेल्या गुणांना जोडण्यात येवून गुणवत्ता ठरविली जाईल आणि या आधारावर उमेदवाराची निवड समितीद्वारे निवड करण्यात येवून शिफारस करण्यात येईल. तसेच उमेदवाराने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या संख्येत सदर उमेदवाराने संगणकीय परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची संख्या जोडण्यात येवून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. आणि वर नमुद असलेल्या सुत्राच्या अधिन राहून उमेदवारास मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. वर नमुद असलेल्या सुत्राच्या आधारावर मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारामधील शेवटच्या उमेदवाराने जे गुण प्राप्त केले असतील ते गुण आणखी इतर उमेदवारांना प्राप्त झाले असतील तर अशावेळी सदर गुणसंख्या प्राप्त करणाऱ्या सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.

लेखी परीक्षेच्या आधारावर तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीमधील उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येवून निवड समितीद्वारे निवड केली जाण्यासाठी जे सुत्र वर नमुद केले आहे. तेच सुत्र लेखी आणि संगणकीय परीक्षा घेतलेल्या उमेदवारांच्या बाबतीत सुध्दा लागू राहील.

ड) ज्या उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येईल त्यांची परीक्षा प्रत्येक वर्गासाठी ९० गुणांची असेल आणि ज्या उमेदवारांची लेखी तसेच संगणकीय परीक्षा घेण्यात येईल. त्यांची लेखी परीक्षा ९० गुणांची आणि संगणकीय परीक्षा २० गुणांची असेल.

इ) पदाचे स्वरूप कार्य कौशल्यावर आधारित असल्यास आणि त्या पदासाठी प्रात्यक्षिकाची गरज भासत असल्यास त्या पदासाठीच्या परिक्षेचे स्वरूप प्रात्यक्षिकावर आधारित राहून हे प्रात्याक्षिक २० गुणांचे असेल.

ई) लेखी परीक्षेसाठी निर्धारित केला जाणारा अभ्यासक्रम, संगणक परीक्षेसाठी निर्धारित केला जाणारा अभ्यासक्रम, वर्गनिहाय प्रत्येक परिक्षेसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांची संख्या, परीक्षा घेण्यासाठी दिला जाणारा वेळ आणि परिक्षेचे वर्गनिहाय वेळापत्रक इत्यादी बाबी ठरवून त्यांची शिफारस केली जाण्यासाठी व्यवस्थापन परिषदेद्वारे जास्तीत जास्त ४ तज्ञ व्यक्तींची समिती नियुक्त करून अहवाल प्राप्त करण्यात येईल.

फ) प्रत्येक गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारास स्थान प्राप्त करण्यासाठी प्रत्येक प्रकारच्या परिक्षेमध्ये किमान ५०% गुण प्राप्त करणे अनिवार्य असेल. यासाठी प्रत्येक परीक्षा हा स्वतंत्र घटक मानण्यात येईल.

६. या निदेशाद्वारे विद्यापीठ शिक्षकेत्तर पदांच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित करण्यात आली आहे.

७. गट—अ पदांकरिता सरळसेवेसाठी वयोमर्यादा किमान ३० वर्षे व कमाल ४० वर्षे राहील. परंतु मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता राहील. पदोन्नतीची पदे भरतांना, जे कर्मचारी सरळसेवेची शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत असतील त्यांना बिंदुनामावलीच्या क्रमानुसार पदोन्नती देण्यात येईल. कनिष्ठ पदावर कार्यरत जे कर्मचारी शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नसतील मात्र त्यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केले असतील अशा कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकरणाला असतील.

८. गट—ब पदांकरिता सरळसेवेसाठी वयोमर्यादा किमान २५ वर्षे व कमाल ३८ वर्षे राहील. परंतु मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता राहील. पदोन्नतीची पदे भरतांना जे कर्मचारी सरळसेवेची शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत असतील त्यांना

बिंदुनामावलीच्या क्रमानुसार पदोन्नती देण्यात येईल. कनिष्ठ पदावर कार्यरत जे कर्मचारी शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नसतील मात्र वयाची ४५ वर्षे पूर्ण केले असतील अशा कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकरणाला असतील.

९. सरळसेवेसाठी गट ''क'' आणि ''ड'' साठी वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे असून मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता असेल.

१०. गट क करीता, ज्या पदांमधुन पदोन्नती देण्यात येणार असेल, ती पदोन्नती देतांना सरळसेवेची शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत असल्यास त्यांना बिंदुनामावलीच्या क्रमानुसार कनिष्ठ पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना नियमानुसार १००/५०:५०/७५:२५/८०:२० या गुणोत्तराने पदावर पदोन्नती देण्यात येईल.

११. निम्न श्रेणी लिपीक हे पद ५० पदोन्नतीने भरावयाचे पद आहे. हे पद भरतांना गट –'ड' मधील कार्यरत सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांची संयुक्त सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात येवून शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवाजेष्ठता आणि बिंदुनामावली क्रमानुसार पात्र समजण्यात येईल.

१२. सरळसेवेने पद भरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यता प्राप्त संस्थेत नियमित/कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू असणार नाही.

१३. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे आस्थापनेवर कार्यरत असलेल्या एकत्रित वैतनिक कर्मचाऱ्यांना सरळसेवेकरीता उच्च वयोमर्यादेची अट लागू असणार नाही.

१४. सरळसेवा आणि पदोन्नतीसाठी गट अ, ब आणि क साठी उमेदवारांना या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. यासाठी, महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.) विभाग यांचे शासन निर्णय क्र. मातंग २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

१५. आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत ज्या दिवशी आश्वासित पदाच्या वेतनश्रेणीचा कर्मचाऱ्यांना लाभ प्राप्त होईल त्या दिनांकापासून संबंधीत पदाच्या अनुभवाचा कालावधी पूढील नियमित पदोन्नतीकरिता ग्राहय धरण्यात येईल.

१६. विद्यापीठातील कार्यरत कनिष्ठ पदावरील कर्मचाऱ्यांना जर वरीष्ठ पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असेल अशा कर्मचाऱ्यांना वरीष्ठ पदावर केलेल्या कार्याचा कालावधी सरळसेवेत नियुक्तीसाठी अनुभव म्हणून ग्राहय धरण्याचा अधिकार कुलगुरूंना असेल.

१७.सरळसेवा नियुक्तीने भरावयाची पदे जेव्हा केंव्हा रिक्त होतील त्या—त्या वेळी रिक्त होणाऱ्या दिनांकाच्या सहा महिण्यापूर्वी ती पदे भरण्याची कार्यवाही प्रशासनाने पूर्ण करावयाची आहे.

१८. पदोन्नतीने नियुक्त करावयाची पदे जेव्हा केव्हा रिक्त होतील त्या पदांचा गोषवारा घेऊन सदर रिक्त पदे भरण्याकरिता साधारणतः वर्षातून दोनदा (माहे मार्च व सप्टेंबर महिन्यात) विभागीय पदोन्नती समितीची सभा आयोजित करून सदर पदे भरण्याची कार्यवाही प्रशासनाने पूर्ण करावयाची आहे.

१९.शिक्षकेत्तर पदांच्या सरळसेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना या निर्देशासोबत जोडून असलेल्या परिशिष्टामधील तक्त्यात नमुद असल्यानुसार असेल.(पृष्ठ क्र. १ ते २२)

२०.निदेश क्र. १९८/२०१६ मध्ये ज्या तरतुदी नमुद करण्यात आल्या होत्या त्या तरतुदी या निदेशाच्या माध्यमातून जशाच्या तशा स्वरूपात लागू करण्यात येत असल्या तरी हा निदेश निर्गमित होण्याच्या दिवसापर्यंत शासन निर्णयाद्वारे जे प्रयोजन विशिष्ट वर्गवारीसाठी करण्यात आले आहे त्या प्रयोजनाचा या निदेशामध्ये समावेश करण्यात आला असून त्याला '*' या चिन्हाद्वारे दर्शविण्यात आले आहे.

गडचिरोली
दिनांक 15 / 05 / २०१८

(डॉ.एन.व्ही.कल्याणकर)
कुलगुरू

(गट—अ)

| अ. क्र | पदनाम, वेतनबॅंड व ग्रेड वेतन | शैक्षणिक अर्हता व अनुभव | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा प्रवेश | विभागीय पदोन्नती (सेवाज्येष्ठता व गुणवतेनुसार) | |
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | **उपकुलसचिव**<br>वेतन बॅंड<br>रु.<br>१५६००—३९१००<br>ग्रेड वेतन रु.६६०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युतर अथवा इयता १२ वी नंतर किमान पाच वर्ष शैक्षणिक कालावधीची पदवी उतीर्ण.<br>२. सहाय्यक कुलसचिव किंवा समकक्ष पदाचा वेतन बॅंड रु. १५६००—३९१००, ग्रेड वेतन रु. ५४००/— मधील किमान तीन वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव<br>**अथवा**<br>महाविद्यालयीन स्तरांवरील पूर्णवेळ शिक्षक म्हणून अध्यापनाचा रु. १५६००—३९१०० ग्रेड वेतन रु. ६०००/— मधील किमान पाच शैक्षणिक वर्षाचा अनुभव<br>**अथवा**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठातील अधिकारी संवर्गात प्रशासकीय कार्याचा पाच वर्षाचा अनुभव | १. सहाय्यक कुलसचिव पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव.<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिकगोपनिय अहवाल समाधानाकारक<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | ५०%पदोन्नती ५०% सरळसेवा |
| २. | **संगणक केंद्र प्रमुख**<br>वेतन बॅंड—१५६००—३९१०० वेतन ग्रेड—७६०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युत्तर (भौतिकशास्त्र/गणित/सांखिकीशास्त्र)पदवी उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर कॉम्प्युटर सायन्स पदविका उत्तीर्ण.<br>**अथवा**<br>एम.एससी. (कॉम्प्यूटर सायन्स)/ अभियांत्रिकी पदवी (इन्फॉर्मेशन टेक्नॉलाजी/कॉम्प्युटर सायन्स/कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी)/एम.सी.ए./ डीओईएससी ची "बी" अथवा "सी" लेव्हल परीक्षा उतीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थामधील प्रोग्रॅमर/ॲनालिस्ट या पदाचा तसेच Updated Knowledge of State of fhe Art Software Systemमधील कामाचा किमान सात वर्षाचा अनुभव. | | एकाकी पद (सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | **सिस्टीम ॲनलिस्ट**<br>वेतन बँड :<br>पिबी—३,<br>रु.१५६००—३९१००<br>ग्रेड वेतन रु. ६६०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.एससी (भौतिकशास्त्र/गणित/सांखिकीशास्त्र) पदवी उतीर्ण किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर कॉम्प्युटर सायन्स पदविका उत्तीर्ण.<br>**अथवा**<br>एम.एससी. (कॉम्प्युटर सायन्स)/ अभियांत्रीकी पदवी (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी/कॉम्पुटर सायन्स/ कॉम्पुटर टेक्नॉलॉजी/एम.सी.ए. /डीओईएसीसी ची "बी" अथवा "सी" लेव्हल परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/ शासकीय संस्थांमधील प्रोग्रॅमर/ॲनालिस्ट या पदाचा तसेच Updated Knowledge of State of fhe Art Software Systemमधील कामाचा किमान सात वर्षाचा अनुभव. | | एकाकी पद (सरळसेवा) |
| ४. | **डाटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर**<br>वेतन बँड :<br>पिबी—३,<br>रु.१५६००—३९१००<br>ग्रेड वेतन रु. ६६०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.एससी. (भौतिकशास्त्र/गणित/ सांखिकीशास्त्र) पदवी उतीर्ण आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर कॉम्प्यूटर सायन्स पदविका उत्तीर्ण.<br>**अथवा**<br>एम.एससी. (कॉम्प्युटर सायन्स)/ अभियांत्रीकी पदवी (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी/ कॉम्पुटर सायन्स/ कॉम्पुटर टेक्नॉलॉजी/एम.सी.ए. /डीओईएसीसी ची "बी" अथवा "सी" लेव्हल परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/ शासकीय संस्थांमधील प्रोग्रॅमर/ॲनालिस्ट या पदाचा तसेच Updated Knowledge of State of fhe Art SoftwareSystemमधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव. | | एकाकी पद (सरळसेवा) |
| ५. | **विद्यापीठ अभियंता**<br>वेतन बँड:<br>पीबी—२,<br>रु. १५६००—३९१००<br>ग्रेड वेतन रु.६६०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी पदवी परीक्षा उत्तीर्ण. **पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य.**<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थांमधील प्रत्यक्ष इमारत बांधकामाच्या पर्यवेक्षणाचा स्थापत्य अभियांत्रीकी संबंधीचा तसेच व्यवस्थापन, दैंनदिन पत्रव्यवहार, निविदा व करारनामे, अंदाजपत्रके तयार करण्याच्या कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव अथवा सहाय्यक /कनिष्ठ अभियंता पदाचा वेतन बँड ९३००—३४८००, ग्रेड वेतन रु. ५४०० या वेतनश्रेणीतील किमान पाच वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव. | १. उपअभियंता पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव.<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनिय अहवाल समाधानकारक.<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | ५०% पदोन्नती<br>५०% सरळसेवा<br><br>सदर पद आळीपाळीने प्रथम पदोन्नती व नंतर सरळसेवेनी भरण्यात येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | **विधी अधिकारी**<br>वेतन बँड<br>रु.९३००—३४८००<br>ग्रेड वेतन :<br>रु.५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एल.एल. एम. पदवी उत्तीर्ण आणि शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये कायदा अधिकारी म्हणुन काम केल्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव किंवा जिल्हा न्यायालयात वकिली केल्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव.<br>**अथवा**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठाची एल.एल. बी. पदवी उत्तीर्ण आणि शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय **किंवा** निमशासकीय संस्थेमध्ये कायदा अधिकारी म्हणुन काम केल्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव किंवा उच्च न्यायालयात वकीली केल्याचा किमान सात वर्षाचा अनुभव. | | एकाकी पद (सरळसेवा) |
| ७. | **सहाय्यक कुलसचिव**<br>वेतन बँड<br>रु.१५६००—३९१००<br>ग्रेड वेतन:<br>रु.५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युत्तर पदवी अथवा १२ वी नंतरची किमान ५ वर्ष शैक्षणिक कालावधीची पदवी उत्तीर्ण.<br>२. अधीक्षक/कक्षधिकारी(सर्वसाधारण) जो यास्तव समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००—३४८००, ग्रेड वेतन रु. ४४००/— मधील किमान तीन वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>महाविद्यालयीन स्तरावरील पूर्णवेळ शिक्षक म्हणून अध्यापनाचा रु. ९३००—३४८०० ग्रेड वेतन रु. ४४००/— मधील किमान पाच वर्षाचा शैक्षणिक अनुभव. | १. अधीक्षक पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनीय अहवाल समाधानकारक.<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | ५०% पदोन्नती<br>५०% सरळसेवा |
| ८. | **नेटवर्क इंजिनिअर**<br>वेतन बँड<br>रु.९३००—३४८००<br>ग्रेड वेतन :<br>रु.५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी (इन्फारमेंशन टेक्नॉलॉजी/कॉम्प्युटर सायन्स/कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी/कॉम्प्युटर सायन्स व अभियांत्रिकी/इलेक्ट्रानिक्स टेलीकम्युनिकेशन/इलेक्ट्रानिक्स व कम्युनिकेशन) परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थामधील नेटवर्क संबधीतचे समकक्ष कामे तसेच व्यवस्थापन,दैनंदिन पत्रव्यवहार,अंदाजपत्रके तयार करण्याच्या कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव अथवा सहाय्यक /कनिष्ठ अभियंता पदाचा वेतन बँड ९३००—३४८००, ग्रेड वेतन रु. ४४०० या वेतनश्रेणीतील किमान तीन वर्षाचा समकक्ष तांत्रिक कामाचा अनुभव. | | एकाकी पद (सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | **प्रोग्रॅमर**<br>वेतन बॅड:<br>पीबी—२,<br>रु.९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु.५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.एससी. (कॉम्प्युटर सायन्स)/एम.सी.एम./एम. सी.ए. /अभियांत्रिकी पदवी (कॉम्प्युटर सायन्स/कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी/इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) परीक्षा उत्तीर्ण.<br>**अथवा**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.एससी. (भौतिकशास्त्र/गणित/सांखिकीशास्त्र) परीक्षा प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण आणि संगणक शास्त्र/ माहीती तंत्रज्ञान मधील पदव्युत्तर पदविका प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण किंवा डीओईएसीसीची ''ए'' लेव्हलची परीक्षा उतीर्ण.<br>२ शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमधील प्रकल्प/लिंक्स सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेशन/वेब डिझायनिंग डेव्हलपमेंट यामधील किमान पाच वर्षाचा अनुभव. | | १००%<br>सरळसेवा |
| १०. | **प्रकाशन अधिकारी**<br>वेतन बॅड:<br>पीबी—२,<br>रु.९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु.५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पत्रकारिता व जनसंवाद विषयातील किंवा समकक्ष पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण आणि मराठी, इंग्रजी व हिन्दी या भाषावर प्रभुत्व आणि लेखन कौशल्य आवश्यक.<br>२. अधीक्षक/कक्षाधिकारी (सर्वसाधारण) जो यास्तव समकक्ष पदावरील वेतन बॅड रु.९३००—३४८००, ग्रेड वेतन रु.४४००/— मधील किमान तीन वर्षाचा प्रकाशन संबधी व प्रशासकीय कामाचा अनुभव. | | एकाकी पद<br>(सरळसेवा) |
| ११. | **जनसंपर्क अधिकारी**<br>वेतन बॅड:<br>रु.९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु.५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची मॉस कम्युनिकेशन/जर्नालिझम /पब्लिक रिलेशन किंवा समकक्ष विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण प्रसार माध्यमामधील (उपसंपादक दर्जापेक्षा कमी नसावा)/ शासन मान्यता प्राप्त संस्थेमधील संपादकीय कामाचा अथवा जनसंपर्क अधिकारी पदाचा किमान पाच वर्षाचा अनुभव.<br>२. मराठी,इंग्रजी व हिन्दी या भाषावर प्रभुत्व आणि लेखन कौशल्य आवश्यक. | | एकाकी पद<br>(सरळसेवा) |
| १२ | **वैद्यकिय अधिकारी**<br>**वेतन बॅड :**<br>पीबी — २,<br>रु. ९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु ५४०० | १ मान्यता प्राप्त विद्यापीठाची वैद्यक विद्याशाखेतील एम.बी.बी.एस. पदवी परिक्षा उत्तीर्ण.<br>२ इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर वैद्यकिय व्यवसायाचा किमान तीन वर्षाचा | | १०० %<br>सरळसेवा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अनुभव तसेच वैद्यक परिषदेमध्ये नोंदणी आवश्यक<br>३ मराठीतील लेखन आणि वाचनाचे ज्ञान आवश्यक. | | |
| १३ | **उपअभियंता (स्थापत्य) वेतन बॅंड :**<br>पीबी — २,<br>रु. ९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु ५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.<br>२. मान्यता प्राप्त शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थांमधील प्रत्यक्ष इमारत बांधकामाच्या पर्यवेक्षणाचा स्थापत्य अभियांत्रिकी संबंधीचा तसेच व्यवस्थापन, दैनंदिन पत्रव्यवहार, निविदा व करारनामे, अंदाजपत्रके तयार करण्याच्या कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव<br>**अथवा**<br>सहाय्यक /कनिष्ठ अभियंता पदाचा वेतन बॅंड ९३००—३४८००, ग्रेड वेतन रु. ४४०० या वेतनश्रेणीतील किमान तीन वर्षाचा तांत्रिक कामाचा अनुभव. | १. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाचा वेतनबॅंड ९३००—३४८००, ग्रेड वेतन ४४०० या वेतनश्रेणीतील किमान तीन वर्षाचा अनुभव.<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनिय अहवाल समाधानकारक आवश्यक<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांकरीता जात वैधता प्रमाणतत्र आवश्यक. | ५०%पदोन्नती<br>५०%<br>सरळसेवा |
| १४. | **उपअभियंता (विद्युत)**<br>वेतन बॅंड:<br>पीबी—२,<br>रु.९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु.५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.<br>२. मान्यता प्राप्त शैक्षणिक /औद्योगिक /शासकीय संस्थेमध्ये संबंधीत क्षेत्रात काम केल्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव आणि कारखाना, सब स्टेशन, उच्चदाब विद्युत वाहिनी, जनरेटर,दुरध्वनी यंत्रणा, वातानुकूलित यंत्रे, निवासी व अनिवासी इमारती यांचे विद्युत परिरक्षण व नविन इमारतीचे स्वतंत्रपणे विद्युत भार संकल्पन तसेच प्रत्यक्ष काम करवून घेण्याची क्षमता असणे आवश्यक. अथवा सहाय्यक /कनिष्ठ अभियंता पदाचा वेतन बॅंड ९३००—३४८०० , ग्रेड वेतन रु.४४०० या वेतनश्रेणीतील किमान तीन वर्षाचा तांत्रिक कामाचा अनुभव.<br>३. शासनमान्य संस्थेचे विद्युत पर्यवेक्षक (Electrical Supervisor )चा परवाना असणे आवश्यक. | | एकाकी पद (सरळसेवा) |
| १५. | **वास्तु शास्त्रज्ञ**<br>वेतन बॅंड:<br>पीबी—२,<br>रु.९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु.५४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची वास्तुशास्त्र विषयाची पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय वास्तुशास्त्र परिषदेमध्ये नोंदणीकृत असावा.<br>२. मान्यताप्राप्त शैक्षणिक/औद्योगिक | | एकाकी पद (सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | /शासकीय संस्थेमध्ये संबंधित क्षेत्रात काम केल्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव आवश्यक अथवा सहाय्यक /कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ पदाचा वेतन बॅंड ९३००—३४८००, ग्रेड वेतन रु. ४४०० या वेतनश्रेणीतील किमान तीन वर्षाचा तांत्रिक कामाचा अनुभव. | | |

## गट—ब

| अ. क्र. | पदनाम वेतनबॅंड व ग्रेड वेतन | सुधारित शैक्षणिक अर्हता व अनुभव | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा प्रवेश | विभागीय पदोन्नती (सेवाजेष्ठता व गुणवतेनुसार) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **अधीक्षक**<br>वेतन बॅंड:<br>रु.<br>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु.<br>४४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. विद्यापीठातील लिपीक संवर्गातील किंवा समकक्ष वेतनश्रेणीतील किमान पाच वर्षाचा प्रशासकीय/कार्यालयीन कामाचा अनुभव<br>**अथवा**<br>शासकीय सेवेतील किंवा शासनमान्य शैक्षणिक संस्थेतील गट 'क' संवर्गामधील एकुण पाच वर्षाचा प्रशासकिय/कार्यालयीन कामकाजाचा अनुभव | १. निवड श्रेणी लिपीक या पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनीय अहवाल समाधानकारक आवश्यक<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | ५०%पदोन्नती<br>५०%सरळसेवा |
| २. | **उद्यान अधीक्षक**<br>वेतन बॅंड:<br>रु.<br>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन<br>रु.४४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम. एससी. हॉर्टीकल्चर पदवी किंवा समकक्ष<br>**अथवा**<br>कृषीशास्त्र मध्ये बी.एससी. पदवी आणि शासनमान्य संस्थेतील कृषीशास्त्र किंवा समकक्ष कार्याचा पाच वर्षाचा प्रात्यक्षिक अनुभव. | | एकाकी पद (सरळसेवा) |
| ३. | **स्थावर अधिकारी**<br>वेतन बॅंड:<br>पीबी—२,<br>रु.<br>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन<br>रु.४४०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी पदविका प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक किंवा शासनमान्य संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकाम व पर्यवेक्षण तसेच दैनंदिन कामाचे | | एकाकी पद (सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पर्यवेक्षण, पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादीचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक. | | |
| ४. | **स्वीय सहायक**<br>वेतन बॅड:<br>रु.<br>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन<br>रु.४६०० | | १. मराठी / इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. आणि मराठी / इंग्रजी टंकलेखन ४० / ५० श.प्र.मि. चे शासकीय व्यवसायिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. वरिष्ठ श्रेणी लघुलेखक (मराठी / इंग्रजी) या पदावरील किमान तीन वर्षाचा अनुभव<br>३. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनिय अहवाल समाधानकारक आवश्यक<br>४. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | १००% पदोन्नती |
| ५. | **पायलट प्लॅंट अधीक्षक**<br>वेतन बॅड:<br>रु.<br>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन<br>रु.४४०० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची ऑईल टेक्नॉलॉजी विषयातील बी.टेक. पदवी परीक्षा उत्तीर्ण. आाणि शासनमान्य ऑईल औद्योगिक क्षेत्रातील किमान तीन वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य.<br>**अथवा**<br>मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतुन ऑईल टेक्नॉलॉजी विषयातील पदविका परिक्षा उतीर्ण आणि शासन मान्य ऑईल औद्योगिक क्षेत्रातील किमान पाच वर्षाचा अनुभव आवश्यक. | | एकाकी पद (सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | **फोरमन (छंदमंदीर)**<br>वेतन बॅड:<br>रु.<br>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु.<br>४४०० | १. यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवी उत्तीर्ण<br>**अथवा**<br>यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी मधील पदविका तसेच औद्योगिक/शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र/शासन मान्य तांत्रिक शिक्षण संस्थेमधील निर्देशक पदाचा पाच वर्षाचा अनुभव | | एकाकी पद (सरळसेवा) |
| ७. | **फोरमन (ल.तां.संस्था)**<br>वेतन बॅड:<br>रु.<br>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन<br>रु.४४०० | १. यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवी उत्तीर्ण<br>**अथवा**<br>यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी मधील पदविका तसेच औद्योगिक/शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र/शासन मान्य तांत्रिक शिक्षण संस्थेमधील समकक्ष पदाचा पाच वर्षाचा अनुभव | | एकाकी पद (सरळसेवा) |
| ८. | **असिस्टंट प्रोग्रॅमर**<br>वेतन बॅड:<br>रु.<br>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रु.<br>४४०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम. एससी. (कॉम्प्युटर सायन्स) एम. सी.ए./अभियांत्रिकी पदवी (कॉम्प्युटर सायन्स/ इन्फार्मेशन टेक्नॉलॉजी/कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी/ कॉम्प्युटर सायन्स व अभियांत्रिकी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.<br>**अथवा**<br>संगणक शास्त्र/माहिती तंत्रज्ञान मधील पदव्युत्तर पदविका प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण किवा डीओईएसीसीची ए लेव्हलची परिक्षा उत्तीर्ण<br>२. शासकीय संस्थेमधील प्रकल्प/लिक्स सिस्टीम ॲडमिनिस्टेशन/वेब डिझायनिंग डेव्हलपमेंट यामधील किमान तीन वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | | १००% (सरळसेवा) |

(गट—क)

| अ. क्र. | पदनाम वेतनबॅड व ग्रेड वेतन | शैक्षणिक अर्हता व अनुभव | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा प्रवेश | विभागीय पदोन्नती (सेवाज्येष्ठता व गुणवत्तेनुसार) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **निवड श्रेणी लिपीक** वेतन बॅड: रु. ९३००—३४८०० ग्रेड वेतन रु.४३०० | | १. उच्च श्रेणी लिपीक या पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव. २. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनीय अहवाल समाधानकारक ३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक | १००% (पदोन्नती) |
| २. | **उच्च श्रेणी लिपीक** वेतन बॅड: रु. ५२००—२०२०० ग्रेड वेतन रु. २४०० | | १. निम्न श्रेणी लिपीक पदावर किमान ३ वर्षाचा अनुभव २. मागील तीन वर्षाचे वार्षीक गोपनीय अहवाल समाधान कारक ३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | १००% (पदोन्नती) |
